# प्रकरण २ रे

## उध्दवराव पाटील यांचे राजकीय व्यक्तीमत्व व विचार प्रणाली

# प्र क र ण २ रे

## उध्दवराव पाटील यांचे राजकीय व्यक्तिमत्व व विचार प्रणाली :

२.१ उध्दवराव पाटील यांचे जीवन चरित्र

२.२ बहुजन समाजातील आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक परिस्थितीचा उध्दवराव यांचेवर झालेला परिणाम

२.३ सत्यशोधक समाजाचा त्यांच्या विचारावर झालेला परिणाम

२.४ मार्क्सवादाचा त्यांचे विचारावर झालेला परिणाम

२.५ उध्दवरावांचा राजकीय प्रवास - स्टेट काँग्रेसमधून शेतकरी संघात शेवटी शेतकरी कामगार पक्षात

२.६ बहुजन समाजाची विकासाची चळवळ

# प्रकरण २ रे

## उध्दवराव पाटील यांचे राजकीय व्यक्तीमत्व व विचार प्रणाली

### २.१ उध्दवराव पाटील यांचे जीवन चरित्र :

उध्दवराव पाटील यांचा जन्म ३० जानेवारी १९२० रोजी परांडा तालुक्यातील माणकेश्वर या त्यांच्या आजोळी झाला. त्यांचे संपूर्ण नांव उध्दवराव साहेबराव पाटील. लोक त्यांना दादा या नांवाने ओळखात. त्यांचे मूळ गांव बार्शी तालुक्यातील इर्ले. तसा हा भाग दुष्काळीच. अठराविश्व दारिद्र्य व शिक्षणाचा गंध नसलेल्या कुटुंबात जन्मास आलेल्या या भूमीपुत्राने स्वकर्तृत्वावर जे यश संपादन केले त्याला इतिहासात तोड नाही. त्यांचे जीवन अनेक पिढयांना मार्गदर्शक ठरणारे आहे.(१)

घरची आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्याने त्यांना सतत आर्थिक टंचाई असायची. त्यांचे तिसरी पर्यन्तचे शिक्षण इर्ले येथेच झाले. त्यांचे शालेय शिक्षण उस्मानाबाद येथेच झाले. पुढे महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांना उस्मानिया व अलिगढ विद्यापिठात जावे लागले. त्यांनी बनारस हिंदु विश्वविद्यालयात इंटरसाठी प्रवेश घेण्याचा प्रयत्न केला परंतु उस्मानिया विद्यापिठास मान्यता नसल्यामुळे त्यांना प्रवेश मिळाला नाही. त्यांनी अलिगड मुस्लीम विद्यापिठात इंटरला प्रवेश घेतला.(२)

त्यांची ज्ञानलालसा त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती व

8206
A

त्यातूनच पुढे ते १९४३ साली ते गणित विषय घेवून बी.एस.सी. झाले. बी.एस.सी. नंतर ते एल.एल.बी. ला गेले व अवघ्या २५ वर्षात त्यांनी वकीलीची पदवी संपादन केली.(३) १९४५ साली एल.एल.बी. झाल्यानंतर त्यांनी उस्मानाबाद येथे नरसिंगराव देशमुख यांच्या हाताखाली वकीली व्यवसायास सुरुवात केली. त्यांचे मन वकीलीत रमणारे नव्हते. त्यांचे चुलते आर्यसमाजाच्या चळवळीत होते. नरसिंगराव देशमुख सावकार विरोधी चळवळीत होते. लहानपणापासूनच त्यांचा राजकीय चळवळीशी संबंध आला होता. विद्यार्थी दशेतच त्यांनी पंडीत नरेंद्रजीना निजाम सरकारने अटक केली म्हणून आपल्या विद्यार्थी मित्रासमवेत एक दिवस शाळा बंद केली होती.(४)

एकमात्र खरे त्यांच्या शालेय जीवनापासून त्यांच्या नेतृत्व गुणाचा विकास झालेला दिसतो. शाळेत आल्यापासूनच ते आर्य समाजाच्या चळवळीत आपल्या मित्रांना घेवून भाग घ्यावयाचे व त्यांचे नेतृत्व करावयाचे.(५) विद्यार्थी दशेत असतानाच ते विद्यार्थी युनियनचे सेक्रेटरी होते. १९४६ ते १९४८ या काळात ते हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालील निजामाच्या सत्तेविरुध्दच्या संघर्षात आघाडीवर होते. निजामाविरूध्द सशस्त्र उठाव करावा लागला. या उठावासाठी त्यांनी तरूणांना शस्त्रे चालविण्याचे आणि गनिमी तंत्राचे शिक्षण देण्याकरिता शिबीरे चालविली. निजामाच्या अनेक पोलीस ठाण्यावर स्वत:च्या नेतृत्वाखाली सशस्त्र हल्ले चढवून पोलीसाना " दे माय धरणी ठाय " करून सोडले. (६)

निजामाविरूध्द सशस्त्र उठावासाठी शस्त्रांची गरज होती. उध्दवराव व गव्हाणे यांनी शस्त्रे मिळविण्यासाठी बडोदा-गोवा गाठले. आझाद हिंद सेनेच्या अधिका-याशी जगन्नाथराव भोसले

यांचेमार्फत संपर्क साधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. रझाकारांनी चालविलेल्या गुंडगिरीला आळा घालण्याचा त्यांनी प्रयत्न केला. स्त्रिया व सामान्य माणसे यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचे विरूध्द संरक्षण करण्यासाठी त्यांची तरूण मने पेटून उठली.(७)

हैद्राबाद पोलीस कारवाई होण्यापूर्वी एक आठवडा अगोदर त्यांच्या गटाची शस्त्रे सरकारने जप्त केली. या गटाच्या सशस्त्र उठावाला रामानंद तीर्थ, बाबासाहेब परांजपे, गोविंदभाई श्रॉफ, भाऊसाहेब वैशंपायन इत्यादीनी विरोध केला व या गटाचा उठाव होवू नये असा पवित्रा घेतला होता. पोलीस कारवाई नंतर संस्थानातील मुस्लीमांची लूट करणे, मुस्लीम स्त्रियावर हात टाकणे हे प्रकार सुरु झाले. सामान्य मुस्लीमाचा रझाकाराच्या अत्याचारात संबंध नव्हता त्यामुळे मुस्लीम नागरिकांना संरक्षण देण्यासाठी त्यांनी व गव्हाणे यांनी जोरदार प्रयत्न केला. मुस्लीमाना संरक्षण देण्याची मोहीम सुरु करण्यामध्ये उध्दवरावानी स्वत: पुढाकार घेतला.(८)

उध्दवरावांच्या राजकीय चळवळीचा व कार्याचा खरा पाया उस्मानाबादला घातला गेला असला तरी ते नेतृत्व केवळ उस्मानाबाद पुरते मर्यादित राहीले नाही. देशातील राजकीय चळवळींचा त्यांच्या मनावर सखोल परिणाम झाला होता. प्रतिसरकारच्या लढयाचा त्यांनी अभ्यास केला होता. क्रांतीसिंह नाना पाटलानी श्रमीक जनतेसाठी इंग्रजी राजवटीविरूध्द जे लढे सुरू केले होते त्याचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला होता. भूमीगत चळवळ व चलेजाव चळवळीने सारा देश निनादून गेला होता. अशा काळातच उध्दवरावांनी स्वत:ला चळवळीत झोकून दिले होते.(९)

उध्दवरावांचा विचार सुरूवातीपासूनच डावा होता. आर्य समाजाच्या चळवळीच्या वातावरणाचा त्यांच्यावर संस्कार झाला होता. अलिगड विद्यापिठातून परत आल्यानंतर त्यांच्या डाव्या विचाराला आणखी धार आली. चुलते हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या सक्रीय लढयात होते. त्यांचेकडूनही त्यांना सामाजिक कार्याचे मिळालेले बाळकडू त्यांच्या व्यक्तीमत्वाची जडणघडण करण्यास उपयुक्त ठरले. जी. डी. लाडांचा त्यांच्याशी आलेला संबंध तर त्यांच्या डाव्या विचाराच्या पायाभरणीत महत्त्वपूर्ण ठरला. एक निश्चित वैचारिक दृष्टी व वारसा जी. डी. लाडानी त्यांना दिला.(१०) अर्थात उध्दवरावावर सत्यशोधक समाजाच्या चळवळीचा फार मोठा प्रभाव होता हे नाकारता येणार नाही.

उध्दवरावांच्या राजकीय लढयाला व सावकार विरोधी चळवळीपासून सुरूवात झाली. लातूरला महाराष्ट्र परिषदेचे शेवटचे अधिवेशन होते. त्याचे स्वागताध्यक्ष पद उस्मानाबादच्या फूलचंद गांधी या सावकारास देण्यात आले होते. तेंव्हा उध्दवराव व नरसिंगराव देशमुख यांनी " भक्षक हा रक्षक नसतो " हे पत्रक काढून तरूण वर्गाच्या मदतीने परिषदेत वाटले. ही परिषद आम्ही होवू देणार नाही अशी भूमिका त्यांनी घेतल्यामुळे फूलचंद गांधी यांना येथूनपुढे सावकारी करणार नाही असे जाहीर करावे लागले. त्यांच्या चळवळीचा हा पहिला विजय होता. (११)

बहुजन समाजाच्या मुलांना शिक्षण व्यवस्थित घेता यावे. त्यांची राहण्याची सोय व्हावी यासाठी मराठवाडयात आण्णासाहेब गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली मराठा व तत्सम जाती शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्य चालू होते. या मंडळाने विद्यार्थ्यांसाठी

संस्थानात वसतीगृहे काढली. उध्दवरावांनी या मंडळाच्या चिटणीस पदाची जबाबदारी अत्यंत चांगलेपणाने पार पाडली. १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाले पण मराठवाडा मात्र या स्वातंत्र्याची फळे उपभोगू शकला नाही.(१२) स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देखील उध्दवरावांचे हेच मत होते की, शिक्षण हे मोफत सरकारने दिले पाहिजे. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे. शिक्षण संस्थानी चांगले शिक्षण देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिक्षण संस्था उभी करणे म्हणजे सरकारचे एजंट बनण्यासारखे आहे असे त्यांचे मत होते. शिक्षण स्पर्धेतून नोकरी-प्रतिष्ठा ही भांडवलदारी चौकटीतील आहे. ती बदलली पाहिजे. सरकारला खऱ्या अर्थाने समाजवाद आणावयाचा असेल तर सर्व भारतातील लोकांना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. रोजगार ग्रामीण भागातच निर्माण झाला पाहिजे, यासाठी शेतीला पुरक जोडधंदे सुरु करण्यास सरकारने मदत केली पाहिजे. शेती व्यवसायाला प्रतिष्ठा प्राप्त करुन दिल्यास खेडयातील तरुण शहराकडे आकर्षिला जाणार नाही.(१३)

निजाम सरकारने भारतीय संघ राज्यात सामील होण्याचे सोडून त्याने रझाकार या संघटनेला आर्थिक व सक्रीय सहाय्य देवून लढा उभा केला.(१४) इत्तेहाद या संघटनेकडून हिंदूवर अतिशय अन्याय व अत्याचार होवू लागले. त्याला प्रतिकार करण्यासाठी हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस कार्यरत झाली. स्टेट कॉंग्रेसने संस्थानातील जनतेला ७ ऑगष्ट हा संघ राज्यात सामील होण्याचा दिन पाळण्याचा आदेश दिला. त्याला सर्वत्र पाठींबा मिळाला. दरम्यान निजामाने हा कार्यक्रम मोडून काढण्यासाठी सर्व ते प्रयत्न केले. लोकांनी कायदेभंग करुन तुरुंगवास पत्करला, अनेक ठिकाणी हल्ले झाले.(१५)

१५ ऑगष्ट हा दिन " स्वातंत्र्य दिन " म्हणून साजरा करावा. आपण अद्यापही बेबंद आणि एकतंत्री राजवटीखाली भरडले जात आहोत. तरी स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या आपल्या बांधवांच्यासाठी तेवढयाच आनंदाने आपण सर्व बंधाने झुगारुन सभा भरवून व घराघरावर राष्ट्रध्वज लावून स्वातंत्र्याच्या प्रतिकाला सलामी द्यावी. स्वामीजींच्या या हाकेला संपूर्ण संस्थानातून विशेषात: मराठवाडयातून फार मोठा प्रतिसाद मिळाला.(१६) ७ ऑगष्ट पासूनच संस्थानात एकूण १८ ठिकाणी लाठीमार आणि ८ जागी गोळीबार झाले. गोळीबारात ५१ माणसे ठार झाली. सप्टेंबर अखेर लढयाची दुसरी अवस्था सुरू झाली. संस्थानालगत स्टेट कॉंग्रेसचे कॅम्पस् काढणे अपरिहार्य होवू लागले. ऑक्टोबर पासून हे कॅंपस् निघण्यास सुरुवात झाली.(१७)

स्टेट कॉंग्रेस अंतर्गतच मराठा व तत्सम जाती शिक्षण प्रसारक मंडळाचा गट कार्य करू लागला. परंतु या मंडळाचे स्वामीजी, बाबासाहेब परांजपे, गोविंदभाई श्रॉफ यांचेशी मतभेद होते. (१८) त्यामुळे कॉंग्रेस अंतर्गत स्वतंत्र कॅम्प दोन्ही गटाचे असत.(१९) उध्दवरावानी या मुक्ती संग्रामात जीवावर उदार होवून भाग घेतला व लढा यशस्वी करुन दाखविला.

हैद्राबाद मुक्ती संग्राम लढा संपल्यानंतर उध्दवरावानी १९५२ ला हैद्राबाद विधान सभेची निवडणूक शेतकरी कामगार पक्षातर्फे फूलचंद गांधी या कॉंग्रेस उमेदवाराविरूध्द लढवून विजय मिळविला. उध्दवरावांच्या राजकीय जीवनाचे तीन टप्पे पडतात. पहिला टप्पा १९५२ ते १९५६ या काळात त्यांनी हैद्राबाद असेंब्लीत शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या प्रश्नावर गाजवून सोडली. विशेषत: त्यांचे नेतृत्वाचे व

त्यांच्या पक्षाने हैद्राबादचा कुळ कायदा पुरोगामी व जास्तीतजास्त जहाल करून घेण्याचा चंग बांधला व तो शेवटाला नेला. उध्दवरावांच्यामुळे मराठवाडयातील बहुसंख्य शेतक-यांची बाजू फार सामार्थ्याने प्रगट झाली. हैद्राबादच्या कुळ कायद्याला पुरोगामी स्वरूप मिळाले त्याचे बरेचसे श्रेय उध्दवरावांच्या नेतृत्वाकडे जाते.(२०)

त्यांची शेतक-यांच्या जीवनासंबंधीची मते अतिशय परखड असत. राज्य पुनर्रचनेच्या प्रश्नाचे वेळी त्यांनी मराठवाडा व कर्नाटक राज्यातील आमदार एकत्र आणण्यासाठी खूप प्रयत्न केले. त्यांचा खरा कस लागला तो संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्यावेळी. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या निमित्ताने त्यांनी परभणी व उस्मानाबाद जिल्हयात आण्णासाहेब गव्हाणेंच्या मदतीने कॉंग्रेसला निवडणूकीत चांगलीच आपटी दिली.(२१)

त्यांच्या राजकीय जीवनाचा दुसरा टप्पा हा १९५७ ते १९६७ असा पडतो. हा काळ त्यांच्या आयुष्यातील महत्वाचा मानला जातो. या काळात महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जोर धरू लागली होती. उध्दवराव पाटील विरोधी पक्ष नेते म्हणून कार्य करू लागले होते. या काळात त्यांच्या भाषणानी महाराष्ट्र विधानसभा गाजली. आपल्या म्हणण्याला कांही तात्वीक बाजू आहे अशा पध्दतीने ते आपले विचार मांडीत. त्यांच्या राजकीय मतांच्या रेषा इतक्या स्पष्ट आहेत की, त्या ओलांडून त्यांचे वैयक्तिक स्वरूपात रूपांतर करणे फार कठीण असे- यशवंतराव चव्हाणांचे मत होते.(२२)

विरोधी पक्ष नेते पद त्यावेळी प्रत्येक राजकीय पक्षाला एक वर्षासाठी मिळत असे. त्यांचेकडे हे पद आल्यानंतर आचार्य अत्रे

म्हणाले होते, " ज्यांना धड कपडे घालता येत नाहीत ते महाराष्ट्राचे पुढारीपण करायला निघाले आहेत. " वर्तमानपत्रातूनही त्यांच्या नेतेपदाच्या कर्तबगारी विषयी शंका व्यक्त करण्यात आली परंतु उध्दवरावानी ही जबाबदारी अत्यंत यशस्वी रितीने पार पाडली की, कॉंग्रेसवाल्यानी देखील कबुल केले की, उध्दवरावामुळे विरोधी पक्षाची उंची एक इंच वाढली.(२३) याच काळात ते राज्यसभेवर निवडून आले.

त्यांच्या राजकीय जीवनाचा तिसरा टप्पा १९६७ ते १९८४ अखेरपर्यन्त आहे. १९६७ ला ते उस्मानाबाद मतदार संघातून विधानसभेवर निवडून आले. त्यावेळी त्यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीचे अध्यक्षपद सांभाळले. सिमाप्रश्नाच्या संदर्भात त्यांनी जी भूमिका घेतली होती ती आजच्या सर्वच राज्यकर्त्यांना मार्गदर्शक ठरणारी आहे. भाषावार प्रांत रचना ही मराठी जनतेच्या न्याय हक्काची चळवळ आहे. ती कोणीही दडपू शकणार नाही. सिमा लढा तीव्र करण्यासाठी त्यांनी अनेक आंदोलने उभी केली. सिमा भागातील बांधावासाठी साराबंदीची ऐतिहासिक लढा त्यांनी पुकारला होता.(२४) सिमा प्रश्नासाठी त्यांनी सत्याग्रह केल्यामुळे बेळगांवच्या तुरूंगात टाकण्यात आले होते. सिमा प्रश्नासाठी अनेकवेळा लाठीमार सहन करावा लागला. सिमा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी फार प्रयत्न केले. परंतु यश आले नाही. ज्या प्रश्नाबद्दल सर्व पक्षामध्ये एकमत होते, तोच प्रश्न सुटला नाही ही खंत त्यांना लागून राहिली होती.(२५)

१९७७ मध्ये ते लातूर मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेले. १९८० ला ते लोकसभेच्या निवडणूकीत पडले. त्यानंतर त्यांनी आपले सर्व आयुष्य शेतकरी व शेतमजुरांच्या प्रश्नासाठी खर्ची घातले.

१९७७ मध्ये संसदेत असताना त्यावेळचे पंतप्रधान चौधरी चरणसिंग यांना शेतीविषयक प्रश्नांच्या संदर्भात मौलीक सल्ला दिला होता. शेती विषयक प्रश्नांच्या संदर्भात चरणसिंग यांना यथार्थ कल्पना असल्याचे प्राजंळ मतही त्यांनी सांगितलेले आहे.(२६)

आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात त्यांना कॅन्सरने गांठले. कॅन्सरशी झुंज देत असताना सेंट जार्ज हॉस्पिटलमधून त्यांनी उरण प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे आंदोलनाला मार्गदर्शन केले होते. (२७) उध्दवरावांचा व त्यांच्या सारख्या इतर नेत्यांचा जेंव्हा मनात विचार येतो तेंव्हा असे वाटू लागते या लोकांच्या वाटयाला दारिद्र्य कां यावे. उदा. क्रांतीसिंह नाना पाटील(२८), एस. एम, जोशी (२९), यशवंतराव चव्हाण, उध्दवराव पाटील यासारख्या मंडळींना अत्यंत हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. अनेक आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागले. दारिद्र्य हे वरदान की शाप असा प्रश्न समोर उभा रहातो. शाप यादृष्टीने की त्यांना अत्यंत हालाखित दिवस काढावे लागले. अनेक आर्थिक संकटाना सामोरे जावे लागले. वरदान यादृष्टीने की अशा हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगल्यामुळे त्यांना सर्वसामान्य लोकांचे जीवन प्रत्यक्ष अनुभवास आले व त्यासाठी ही सर्व मंडळी सामान्यांच्या प्रश्नासाठी अखेरपर्यन्त झगडताना दिसतात.समाजवादी विचारांचा म्हणजेच मार्क्सवाद, लेनिनवाद या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडण्याचे हे एक प्रमुख कारण असू शकेल.

१९५२ मध्ये उध्दवराव विधानसभेवर निवडून आले. १९५७ मध्ये मुंबई राज्यात ते आमदार झाले. १९६२ च्या निवडणूकीत त्यांचा पराभव झाला. १९६४ मध्ये ते राज्यसभेवर निवडून गेले. १९६७ मध्ये पुन्हा विधानसभेवर निवडून आले. १९७२ च्या निवडणूकीत त्यांचा पराभव झाला. १९७७ ला लातूर मतदार संघातून ते लोकसभेवर निवडून

गेले. १९८० ला लोकसभेची निवडणूक ते हरले. उध्दवराव पाटलांचा राजकीय प्रवास असा झाला.(३०)

## २.२ बहुजन समाजातील आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक परिस्थितीचा उध्दवराव यांचेवर झालेला परिणाम :

कोणताही विचारवंत अथवा राजकीय नेता आपण पाहिल्यास त्याच्यावर तो ज्या समाजातून आला आहे त्या समाजातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीचा प्रभाव पडलेला असतो. मॅकिव्हेली, कार्लमार्क्स, प्लेटो, ॲरिस्टॉटल यांची उदाहरणे डोळ्यासमोर घेतल्यास तत्कालीन परिस्थितीचा त्यांच्या विचारावर फार मोठा प्रभाव पडलेला दिसतो. उध्दवराव ज्या समाजातून पुढे आले त्या समाजातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय परिस्थितीचा प्रभाव त्यांचेवर पडलेला दिसून येतो. मुळातच त्यांचा जन्म एका गरिब शेतकरी कुटुंबात झाल्यामुळे शेतकरी, कामकरी व शेतमजुराविषयी त्यांचे मनात आदर निर्माण झाला. स्वत:चीच आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्यामुळे सामान्य शेतकरी आपल्या स्वत:च्या शेतातील विहिरीत बोअर घेवू शकत नाही हे स्वानुभवावरुन त्यांना दिसून आले.(३१)

शिक्षणाची त्यांची झालेली परवड पाहतां बहुजन समाजातील मुलांना शिक्षण घेणे सोपे व्हावे म्हणून मराठा व तत्सम

जाती शिक्षण प्रसारक मंडळाच्या मदतीने त्यांनी मराठवाडयात वसतीगृह काढली. मराठा व तत्सम जाती शिक्षण प्रसारक मंडळाचे चिटणीसपद त्यांनी भूषविले.(३२) अलिकडील काळात त्यांनी उस्मानाबाद येथे शिवाजी हायस्कूल काढले. सर्वसामान्यांना मोफत शिक्षण मिळाले पाहिजे हे पक्षाच्या प्लॅटफॉर्मवरुन त्यांनी सांगितले. १९६८ साली महाराष्ट्र सरकारने ग्रामीण विद्यार्थ्यांचे शैक्षणिकदृष्टया हाच्चीकरण करणारी श्वेतपत्रिका जाहीर केली होती. उध्दवराव ज्या समाजातून आले होते त्या समाजातील मुलांची बौध्दीक कुवत त्यांना माहित होती. या श्वेतपत्रिकेचे काळे स्वरुप त्यांनी कोल्हापूर येथे जाहीरपणे मांडले. ही श्वेतपत्रिका गाडून टाकण्यासाठी आवाज उठविण्याचा सल्ला त्यांनी नागरिकांना दिला. श्वेतपत्रिके विरूध्द आवाज उठविणारे ते पहिले बहुजन समाजाचे नेते होते.(३३)

उध्दवरावांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाल्यामुळे शेतक-यांचे प्रश्न त्यांना चांगले माहित होते. शेतीला जोपर्यन्त आपण उद्योग म्हणून मान्यता देत नाही तोपर्यन्त शेतीचे भवितव्य बरोबर नाही. सरकारने चांगले तंत्रज्ञान शेतक-याला पुरविले पाहिजे. खुल्या बाजारपेठेला त्यांचा विरोध होता. यामुळे शेतक-याचा व ग्राहकाचा कांहीच फायदा होत नाही उलट मधला दलाल (व्यापारी) त्याचा फायदा घेतो. यासाठी सरकारने धान्य खरेदी केली पाहिजे. शेतीला मनुष्यबळ परवडणारे नाही कारण शेतकरी आर्थिकदृष्टया दुर्बल झालेला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची रचना भांडवलदारी स्वरुपाची झाल्यामुळे नोकरशाहीचा प्रभाव निर्माण झाला. या अर्थव्यवस्थेमुळे खेडयात रोजगार उपलब्ध होत नाही. त्यामुळे खेडी ओस पडणार व शेती व्यवसायाच्यादृष्टीने मजूर समस्या निर्माण होतील म्हणून कुशल

कामगाराइतके वेतन अकुशल कामगारांना दिले पाहिजे. परिणामी लोकांचा शहराकडे जाण्याचा ओढा कमी होईल असे त्यांचे मत होते.(३४)

शेती व्यवसायाकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष शेतीमालाला किफायतशीर भाव बांधुन देणे, बँकामधील कर्जवाटप, जमिनीचे फेरवाटप इत्यादी प्रश्नावर ते प्रभावीपणे व विचार प्रवर्तक भाषणे करीत.(३५) जोपर्यन्त शेतीमालाला परवडणारे भाव मिळत नाहीत तोपर्यन्त शेतकरी कर्जमुक्त होवू शकत नाही. शेतक-याने अधिक धान्य पिकवावे यासाठी बँकेने त्याला पुरेशा प्रमाणात कर्ज उपलब्ध करुन दिले पाहिजे तरच शेतकरी अधिक धान्य पिकवू शकेल अन्यथा देशाला अन्नधान्याची आयात करावी लागेल. यासाठी सरकारने शेतीसाठी उदार व योग्य धोरण स्विकारले पाहिजे. शेतीमालाला किफायतशीर भाव मिळाला पाहिजे ही मागणी करणारे उध्दवराव पहिले होते. त्यांच्या या मागणीची यशवंतराव चव्हाणानी टिंगल केली परंतु तेच यशवंतराव १९८० मध्ये शेतक-यांच्या निघालेल्या दिंडीत सामील होवून स्वतःला अटक करुन घेतली. शेतकरी व शेत मजूर यांच्याविषयी त्यांना अतिशय जिव्हाळा होता. मागासवर्गीयांना पोलीस पाटील करा ही मागणी करणारे ते एकटे होते. १९५२ मध्ये तुळजापूर नगरपालिकेचा पहिला नगराध्यक्ष मागासवर्गीय करण्यात त्यांचा फार मोठा हात होता.(३६)

त्यांची मराठवाडा विद्यापिठाच्या अर्थशास्त्राच्या बोर्ड ऑफ स्टडीजवर सभासद म्हणून निवड झाल्यानंतर, देशात समाजवाद तत्वत: मान्य झालेला आहे. त्याला अनुकूल अशी पुस्तके न लावता टिकाकारांची पुस्तके लावली जातात हे बंद झाले पाहिजे

असे त्यांनी सांगितले. आजचे अर्थशास्त्र शेतीशी निगडीत नसून ते व्यापार व उद्योगधंदे यांच्याशी निगडीत आहे. ७० % जनतेचा भार शेती व्यावसायावर असल्यामुळे या विभागातून येणा-या विद्यार्थीना शेतीच्या अर्थशास्त्राचे शिक्षण देणे महत्वाचे आहे असे सांगितले ते केवळ स्वत: शेतकरी कुटुंबातील होते म्हणूनच.(३७)

शेती व शेतकरी हा त्यांचा आवडीचा विषय बनला तो केवळ स्वत: शेतकरी होते म्हणूनच. त्यांनी शेतीशास्त्राचा सखोल अभ्यास तर केलाच परंतु या प्रश्नाचे चिंतन देखील केले. त्यांनी व्यासपिठावरुन शेतक-यांचे अनेक ज्वलंत प्रश्न मांडले ते केवळ बहुजन समाजाचे म्हणूनच (३८) हैद्राबाद संस्थानात बहुजन समाजातील लोकांना योग्यप्रकारची वागणूक मिळत नव्हती हे मागे निदर्शनास आले आहेच. तत्कालीन परिस्थिती सुध्दा त्यांचे अन्यायाविरुध्द लढण्याचे विचार पक्के करण्यास कारणीभूत ठरली.

हैद्राबाद संस्थानातील सामाजिक व राजकीय परिस्थितीचे निश्चित असे परिणाम त्यांच्या विचारावर झालेले दिसून येतात. शेतक-यावरती निजाम राजवटीत होणा-या अन्यायाविरुध्द त्यांनी विधानसभेत जो आवाज उठविला ते केवळ त्या काळातील राजकीय व सामाजिक परिस्थितीमुळेच. हैद्राबाद कुळ कायदा पुरोगामी बनविला किंवा कमाल व किमान जमीन मर्यादा , व्यक्तीगत शेती मशागत, शेतीचे व्यवस्थापन कुळांचे संरक्षण याबाबत जे विचार प्रकट केले ते सामाजिक परिस्थितीमुळे म्हणता येईल.(३९)

हैद्राबाद संस्थानातील राजकीय परिस्थितीच्या रेटयामुळेच त्यांनी महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ चालविण्या-मध्ये पुढाकार घेतला. ते निजामी राजवटीत जे मराठयांचे हाल झाले ते

पाहूनच त्यांची अशी विचारसरणी बनली की भाषावार प्रांतरचना ही मराठी जनतेच्या न्याय हक्काची चळवळ असून ती कोणीही दडपू शकणार नाही.(४०)

उध्दवराव ज्या समाजातून वरती आले त्या समाजाची आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती हे त्यांचे राजकीय विचार प्रगल्भ करण्यास कारणीभूत ठरलेली दिसून येते. त्यांनी राजकीय क्षेत्रात एकूण जी कामगिरी केली, कार्य केले या त्यांच्या कार्यात ते ज्या समाजातून आले त्याचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. जसा मॅकिव्हेली हा काळाचे अपत्य होता. अर्थात कोणताही राजकीय विचारवंत हा तत्कालीन परिस्थितीवर आधारीतच आपले विचार मांडीत असतो. त्याप्रमाणे उध्दवराव हे ज्या समाजातून आले त्या समाजाची आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक परिस्थिती त्यांचे विचार पक्के करण्यास कारणीभूत ठरली हे पुढील प्रसंगावरुन स्पष्ट होते. १९७२ मध्ये वसंतराव नाईकांचे विरूध्द अविश्वासाचा ठराव मांडला होता. तो ठराव मागे घेण्याबाबत त्यांचेवर मानसिक दडपण आणण्याचे प्रयत्न केले तेंव्हा त्यांनी वसंतराव नाईकाना उत्तर दिले की, " तुमचे व माझे संबंध चांगले आहेत, तुमच्याबद्दल माझ्या मनात आदर आहे. परंतु दुष्काळपिडीत जनता व वसंतरावजी नाईक यामध्ये कोणाशी मी प्रामाणिक रहावे असे वाटते. मी जन्मभर लोकाशी एकनिष्ठ राहिलो आहे. या सभागृहात मी अप्रामाणिक विरोधक राहण्यापेक्षा मला राजिनामा देण्यास सांगितले तर ते मी करीन." (४१)

## २.३ सत्यशोधक समाजाचा त्यांच्या विचारावर झालेला परिणाम :

मुंबई राज्यात पश्चिम महाराष्ट्रामध्ये महात्मा फुलेनी सत्यशोधक समाजाची चळवळ सुरु करुन फार मोठी क्रांती केली. तशातच

या चळवळीला शाहु महाराजांचा राजाश्रय मिळाला. बहुजन समाजातील मंडळी या चळवळीकडे मोठया प्रमाणात आकर्षिली गेली. महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रामध्ये विशिष्ठ वर्गाची मक्तेदारी होती. बहुसंख्य समाज शिक्षणापासून वंचित राहिला होता, हे ओळखून महात्मा फुलेनी शिक्षणाची चळवळ उभी केली. समाज सुशिक्षित झाल्याशिवाय त्यांना त्यांचे हित कळणार नाही हे फुलेंनी ओळखाले होते. तशातच ब्रिटीश राजवटीने शेतक-यावर अनेक अन्याय व जुलूम करण्यास सुरुवात केली होती. तेंव्हा या अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य " शेतक-याचा आसूड " हा ग्रंथ लिहून केले. या सर्व परिस्थितीचा परिणाम म्हणून महाराष्ट्रात सत्यशोधक समाजाची चळवळ जोर धरु लागली.(४२)

उस्मानाबाद हा मराठवाडयातील एक जिल्हा. उध्दवराव हे उस्मानाबाद जिल्हयात राहणारे. उस्मानाबाद जिल्हा सुरुवातीपासूनच शिक्षणाने पुढारलेला रहात आला आहे. निजामाच्या काळात आर्यसमाजाची चळवळ उस्मानाबादमध्ये फार प्रभावी होती. निजाम राजवटीतील बहुतेक सुशिक्षित मध्यम वर्गातील लोक स्टेट कॉंग्रेसमध्ये आले व तिच्याच झेंडयाखाली ते पोलीस कारवाईपर्यन्त लढले. स्टेट कॉंग्रेसवर तिच्या निर्मितीपासूनच बंदी घातली होती. आंध्र परिषद, कर्नाटक परिषद, महाराष्ट्र परिषद यामार्फत राजकीय जागृतीचे कार्य चालत असे. दरम्यानच्या काळात मराठवाडयाचा विदर्भाशी संबंध आला. विदर्भामध्ये सत्यशोधक समाज, ब्राम्हणेतर चळवळ व बहुजन समाजाच्या इतर चळवळी ज्या चालत होत्या त्यांनी मराठवाडयाच्या कांही भागात थोडाफार प्रवेश मिळविल्याचे दिसते.(४३)

महाराष्ट्रातील बहुजन समाजातील तरुण मंडळीवर सत्यशोधक चळवळीचा फार मोठा प्रभाव पडला होता. केशवराव जेधे,

दिनकरराव जवळकर, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव, क्रांतीसिंह नाना पाटील, भाऊराव पाटील, जी. डी. लाड, ए. डी. भोसले अशी अनेक मंडळी सत्यशोधक चळवळीकडे आकर्षिली गेली होती. महाराष्ट्रातील शेतकरी कामगार पक्षाचे नेते जेधे, मोरे, लाड, नाना पाटील, ए. डी. भोसले यांच्याशी उध्दवरावांचा संपर्क व वैचारिक एकवाक्यता होतीच.(४४)

त्यामुळे सहाजिकच उध्दवरावांच्या विचारावर सत्यशोधक समाजाच्या चळवळीचा प्रभाव पडला होता, हे दिसून येते. कॉंग्रेसचे हातून शेतक-याचे व कामगाराचे राज्य स्थापन होणार नाही हे दिसून आल्याबरोबर या मंडळीनी कॉंग्रेस अंतर्गत शेतकरी संघ स्थापन करण्याचा प्रयत्न केला. परंतु तोही मोडून काढण्यात आला. त्याचा परिणाम म्हणून ही मंडळी कॉंग्रेसमधून बाहेर पडली व त्यांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.(४५) याच पावलावर पाऊल म्हणून मराठवाडयात-ही आण्णासाहेब गव्हाणे, नरसिंगराव देशमुख, पंडीतराव गव्हाणे, नारायणराव वाघमारे, उध्दवराव पाटील, खुशालराव मोताळे, ज्ञानेश्वर पाटील इत्यादी मराठवाडयातील नेत्यानी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.(४६) उध्दवराव शेतकरी कामगार पक्षाकडे आकर्षित गेले याचाच अर्थ असा की त्या काळातील सत्यशोधक समाजाच्या चळवळीबद्दल बहुजन समाजातील लोकांना विशेषत: तरूणांना असलेले आकर्षण हे होय.

## २.४ मार्क्सवादाचा त्यांच्या विचारावर झालेला परिणाम :

शेतकरी कामगार पक्षाचा दाभाडी प्रबंध हा लिखित स्वरूपाचा कागदोपत्री पुरावा आहे. या प्रबंधानुसार शेतकरी

कामगार पक्षाला मार्क्सवाद मान्य आहे हे निश्चित होते. उध्दवराव पाटील यांचे विचारावर मार्क्सवादाचा परिणाम किती झाला होता हे त्यांनी प्रा. बा. ह. कल्याणकर यांना दिलेल्या मुलाखातीवरून दिसून येईल.(४७) शेतकरी कामगार पक्षाची स्थापना होण्यामागच्या राजकीय प्रेरणा पाहिल्यास असे दिसून येते की, स्वराज्य मिळाल्यानंतर काँग्रेस पक्षात काम करणाऱ्या शंकरराव मोरे, केशवराव जेधे, भाऊसाहेब राऊत, र. के. खाडीलकर, क्रांतीसिंह नाना पाटील, तुळशीदास जाधव यांनी शेतकरी संघ स्थापन करण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसमध्ये राहून असा काँग्रेस अंतर्गत शेतकरी संघ काढण्याची परवानगी काँग्रेस नेतृत्वाने दिली नाही. स्वराज्य प्राप्तीनंतर काँग्रेस बड्या भांडवलदाराचेच नेतृत्व करील, बहुजन समाजाचे नेतृत्व करणार नाही असे वरील मंडळीला वाटले. म्हणून महाराष्ट्रातला शेतकरी समाज जागृत करणे आणि त्यांना संघटीत करणे ही या पक्षाच्या स्थापनेमागील प्रेरणा होती. (४८)

It should have been included here.

मोरारजी देसाई आणि बाळासाहेब खेर हे बहुजन समाजाचे नेतृत्व करणारी नाहीत ते फक्त भांडवलदारांचे नेते आहेत. भांडवलदारी अर्थव्यवस्थेला विरोध करण्यासाठी १९५० मध्ये शेतकरी कामगार पक्षाने मार्क्सवादी धोरण स्विकारले. आपल्या देशातील मार्क्सवादी चळवळ स्वराज्याच्या चळवळीत सहभागी न झाल्यामुळे ती बदनाम झाली होती. बहुजन समाजातील जागृत नव्या शक्तींनी शेतकरी कामगार पक्षाची बांधणी करून लालझेंडा खेडयापाडयात नेला असे त्यांचे मत होते. शेतकरी कामगार पक्षाच्या निर्मितीमुळे महाराष्ट्रात शेतकऱ्यापर्यन्त मार्क्सवाद, लेनिनवाद पोहोचला.

खेडयापाडयापर्यन्त मार्क्स, लेनिन यांची नांवे पोहोचली. याचे बरेच श्रेय शेतकरी कामगार पक्षाकडे जाते.(४९)

भांडवलदारी ही एक जागतिक घटना आहे, तिला विरोध करण्यासाठी जगातल्या समाजवादी शक्ती मजबूत करणे अपरिहार्य आहे असे त्यांचे मत होते. जमीनदारी आणि जहागिरदारी नष्ट केल्याशिवाय समाजवादी समाज उभा राहणार नाही. परंतु डाव्या विचारसरणीचे जे पक्ष आज देशात आहेत ते खूपच कमकुवत आहेत. भांडवलदारी शोषण ते थांबवू शकत नाहीत, शेतकरी कामगार पक्षाने शेती मालाला भाव मागितल्याबरोबर कम्युनिस्टानीही मागणी मार्क्सवादावर आधारीत नाही म्हणून त्यांनी शेतकरी कामगार पक्षाला विरोध केला. भांडवलशाही आक्रमणापासून शेतकरी वाचविण्याची आज गरज आहे.(५०) हे वरील विचार शेतकरी कामगार पक्षाचे पर्यायाने उध्दवरावांचे केवळ मार्क्सवादाच्या प्रभावामुळेच निर्माण झाले.

उध्दवरावांना आंधळा मार्क्सवाद मान्य नव्हता. रशिया, चीन या देशातील परिस्थिती वेगळी होती. डोळसपणाने भारतात मार्क्सवाद हा भारतीय परिस्थितीचा विचार करुन रुजवला पाहिजे असे त्यांचे मत होते. महात्मा फुलेनी जो "त्री सुत्री" कार्यक्रम सांगितला होता त्याच्याकडे ते जास्त आकर्षित झाले होते, असे दिसून येते. महात्मा फुले, डॉ. आंबेडकरानी ज्याप्रमाणे शुद्र-अतिशुद्र यांच्यामध्ये स्वाभिमानी वृत्ती निर्माण करुन अन्यायाविरुध्द संघर्ष निर्माण करण्याची ताकद वाढविली त्याप्रमाणे शेतक-यामध्ये आर्थिक, सामाजिक समतेसाठी लढण्याची ताकद व स्वाभिमानी वृत्ती निर्माण करुन तो खा-या अर्थाने

देशाचा राज्यकर्ता बनावा या जिद्दीनेच त्यांनी शेतक-यांचे व शेतमजूरांचे प्रश्न हाताळण्याच्या राजकारणास सुरुवात केली, (५१) अर्थात के केवळ मार्क्सवादाच्या प्रभावामुळेच.

भारतातल्या कम्युनिस्ट पक्षाने या देशातल्या सामाजिक, आर्थिक घडणीवर मार्क्सवादाचा कस लावून विश्लेषण करण्यांत दिरंगाई केली. अनेक चुका केल्या त्या शेतकरी कामगार पक्षाने केल्या नाहीत असे त्यांचे मत होते. शेतकरी कामगार पक्षात बरीचशी मंडळी ब्राम्हणोत्तर चळवळीतून आल्यामुळे वर्ण संस्कृतिला मार्क्सवादी भूमिकेतून शेतकरी कामगार पक्षाने विरोध केला. महात्मा फुलेंचा वारसा सांगणारा हा पक्ष आहे. महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, शाहु महाराज, मार्क्स, लेनिन या समकालीन मंडळींनी समाज जीवनाला दिशा दिली आहे.(५२) मार्क्सने कम्युनिस्ट मॅनिफेस्टो १८४८ साली जाहीर केला त्याचवेळी महाराष्ट्रात महात्मा फुलेंनी गुलामगिरी व इतर वाङ्मय लिहिले आहे. मार्क्स आणि फुले यांच्या विचारात बरेचसे साम्य आहे. मार्क्सवादावर फार मोठी निष्ठा असणारे उध्दवराव पाटील हे एक होते. मार्क्सवादावर सर्वसामान्य माणसाला चांगले दिवस येतील अशी त्यांची धारणा होती.(५३) उध्दवरावांचे कार्य पाहिले म्हणजे त्यांनी कायदे मंडळात व कायदेमंडळाच्या बाहेर ज्या चळवळी उभ्या केल्या त्यामागे निश्चितच मार्क्स व फुले यांच्या विचाराचा प्रभा दिसून येतो.

## २.५ उध्दवरावांचा राजकीय प्रवास - स्टेट कॉंग्रेस मधून शेतकरी संघात - शेवटी १९४९-५० मध्ये शेतकरी कामगार पक्षात :

उध्दवराव पाटील यांचा शिक्षणाच्या निमित्ताने

हैद्राबाद संस्थानाशी संबंध आला. विद्यार्थी दशेपासूनच ते राजकीय चळवळीकडे आकर्षित झाले होते. कांही तरी करून दाखविण्याची खुमखुमी त्यांच्या तरूण मनात असावयाची.(५४) उस्मानाबाद येथील मल्टीपर्पज हायस्कूलमध्ये दहावीत शिकत असताना आर्य समाजाचे नेते नरेंद्रजीना निजाम सरकारने अटक केली. त्या अटकेचा निषेध करण्या-मध्ये उध्दवरावांचा पुढाकार होता.(५५)

मराठवाड्यात हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसने निजामाचे राजवटी विरूध्द असहकाराची चळवळ सुरु केली होती. बहुजन समाजावर निजामाने फार मोठे अन्याय, अत्याचार सुरु केले होते. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसने निजामाविरूध्द फार पध्दतशीर लढा सुरु केला होता. त्याला जातीय स्वरूप न येवू देता नागरिकांच्या हक्काची मागणी केली होती. तसेच जबाबदार राज्यपध्दतीचा आग्रह धरला होता. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसमध्ये बहुजन समाजातील मंडळी कार्य करीत होती. सुरूवातीला कॉंग्रेस अंतर्गत जास्त फाटाफूट नव्हती. परंतु पुढे नेतृत्वाच्या प्रश्नावरून त्यांच्यात फाटाफूट झाली.(५६)

अखिल भारतीय कॉंग्रेसला शह देणारी चळवळ म्हणून महाराष्ट्रात सत्यशोधक समाजातून निर्माण झालेली ब्राम्हणेत्तराची चळवळ जोर धरु लागली होती. ब्राम्हणेत्तर लीग म्हणजे सत्यशोधक चळवळीला फुटलेला नवा धुमारा होता अशी जेधे जवळकरांची धारणा होती. दोघेजण सत्यशोधक समाजाच्या विस्तारासाठी भास्करराव जाधव यांना साथ देत होते.(५७) टिळकांचे नेतृत्वाखाली जोपर्यन्त राष्ट्रीय कॉंग्रेस कार्य करीत होती तोपर्यन्त महाराष्ट्रात ब्राम्हणेत्तर चळवळ जोरात चालली होती. टिळकांच्या मृत्युनंतर भारतीय राजकारणाची सूत्रे गांधीच्या हाती गेली. त्यांनी भारतीय राजकारण शहरांच्या

बाहेर ग्रामीण भागापर्यन्त सुशिक्षीतांच्याकडून बहुजन समाजापर्यन्त नेण्याचा फार मोठा प्रयत्न केला.(५८) गांधीकडे नेतृत्व येताच बहुजन समाजातील तरूण वर्ग कॉंग्रेसकडे आकर्षित होवू लागला. १९30 ते १९३४ या काळात अनेक ब्राम्हणेत्तर तरूण कॉंग्रेसकडे आकर्षित गेले होते.(५९)

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर, १९४२ साली जाहीर केल्याप्रमाणे राष्ट्रीय कॉंग्रेस शेतकऱ्यांचे व कामगारांचे राज्य स्थापन करील असे वाटत होते. परंतु कॉंग्रेसचे धोरण हे कामगार व शेतकरी वर्गाविरूध्द दिसू लागले म्हणून ब्राम्हणेत्तर चळवळीतून आलेल्या बहुजन समाजाच्या मंडळीने ११ सप्टेंबर १९४८ रोजी ~~दस्त~~ कॉंग्रेस अंतर्गत शेतकरी संघ स्थापन करण्याचा ठराव मंजूर केला. जेधे, मोरे, नाना पाटील, राऊत तुळशीदास जाधव, यशवंतराव चव्हाण, पी. के. सावंत, के. डी. पाटील, नवल पाटील वगैरे कॉंग्रेस नेते व कार्यकर्ते यांनी संघाच्या स्थापनेस हातभार लावला होता.(६0)

राष्ट्रीय कॉंग्रेस अंतर्गत गांधीवादी गट, समाजवाद्यांचा गट व बहुजन समाजातील व्यक्तींचा गट असे तीन गट होते. गांधीवादी व समाजवादी गटाचे नेतृत्व ब्राम्हणी होते.(६१) १९४६ मध्ये प्रांतिक कॉंग्रेसच्या निवडणूका झाल्या त्यात जेधे गटाला बहुमत प्राप्त होवून जेधे प्रांतिकचे अध्यक्ष झाले. मंत्रीमंडळ मात्र त्यांच्या गटाचे नव्हते. तेंव्हा अध्यक्ष या नात्याने जरी जेधे यांनी मंत्रीमंडळाला कांही धोरण ठरवून दिले तरी खेर मंत्रीमंडळ त्याचा विचार करीत नव्हते. त्यामुळे मंत्रीमंडळ व कॉंग्रेस संघटना यांच्यात दुरावा वाढत गेला. खेर मंत्रीमंडळाचे धोरण शेतकऱ्यांचे हीत साधणारे नाही असे बहुतेकाचे मत होते.(६२)

वरील प्रकारच्या परिस्थितीला कंटाळून कॉंग्रेस अंतर्गत सप्टेंबर १९४६ मध्ये शेतकरी संघ स्थापन केला. या संघाला मान्यता

देण्याचा प्रश्न निर्माण झाला. २४ व २५ एप्रिल १९४८ रोजी मुंबईत आखिल भारतीय काँग्रेसची बैठक झाली. काँग्रेसमध्ये स्वतंत्र घटना व कार्यक्रम असलेले उपपक्ष किंवा गट असू नयेत अशा अर्थाची सूचना मंजूर करण्यांत आली.(६३) त्यामुळे बहुजन समाजातील कार्यकर्त्यांचा गट काँग्रेसमधून बाहेर पडला(६४) व त्यांनी १३ जून १९४९ रोजी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.

मराठवाड्यातही स्टेट काँग्रेस अंतर्गत तीन गट कार्य करीत होते. स्टेट काँग्रेसची मंडळी अधूनमधून गांधीचा सल्ला घेत असत. हैद्राबाद काँग्रेसमध्ये नेतृत्वावरुन दोन गट पडले होते. एक जनार्दन देसाईचा गट व दुसरा स्वामी रामानंद तिर्थांचा गट. देसाई गटाची विचारसरणी वल्लभभाईंच्या पध्दतीची होती तर स्वामीजी नेहरुवादी विचारांचे होते. तिसरा गट मार्क्सवादी, लेनिनवादी विचारांचा असल्यामुळे दोन्ही गटात सामावू शकला नाही. त्यांनी काँग्रेस अंतर्गतच शेतकरी संघ काढला होता. त्याला मान्यता देण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. पोलीस कारवाई नंतर प्रतापगिरजी कोठीमध्ये झालेल्या स्टेट काँग्रेसच्या बैठकीत स्वामी गटाने काँग्रेसने शेतकरी संघ विसर्जित करावा असा ठराव मंजूर केला त्यानंतर जालन्याला बैठक झाली. वाटाघाटी फिस्कटल्या. आण्णासाहेब गव्हाणेंच्या नेतृत्वाखाली, नरसिंगराव देशमुख, उध्दवराव पाटील, ज्ञानेश्वर पाटील, खुशालराव मोताळे यांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना मराठवाड्यात केली.(६५) अशा रितीने उध्दवरावांचा राजकीय प्रवास स्टेट काँग्रेसमधून शेतकरी कामगार पक्षात दाखल होईपर्यन्त झाला.

## २.६ बहुजन समाजाची विकासाची चळवळ :

मराठवाडा हा हैद्राबाद संस्थानातील निजामाच्या नियंत्रणाखाली होता. संपूर्ण देशाचे चित्र जर पाहिले तर असे दिसून

येते की, शिक्षणाची मक्तेदारी एका विशिष्ठ वर्गाकडे त्यामुळे प्रशासनातील महत्वाची पदे त्या वर्गाकडेच चालून आलेली. शिक्षणाचा जास्तीतजास्त फायदा त्यांनीच करून घेतलेला. याउलट संख्येने जास्त असणारा बहुजन समाज हा शिक्षण क्षेत्रात मागे पडू लागला तेंव्हा महात्मा फुलेंनी सत्यशोधक समाज स्थापन करून त्याव्दारे समाज-जीवनाची ओळख सर्वसामान्याला करून दिली. शेतक-यांच्या परिस्थितीचे दर्शन त्यांनी या चळवळीतून समाजापुढे मांडले. एक वर्ग शिक्षणाचा व या परिस्थितीचा लाभ उठवित आहे याची जाणिव करून दिली. महाजिकच फुलेंच्या या सत्यशोधक समाजाच्या चळवळीने बहुजन समाजातील तरूण वर्ग ब्राम्हणेत्तर चळवळीकडे आकर्षिला गेला. महात्मा जोतीराव फुले व शाहु महाराज यांच्यापासून प्रेरणा घेतलेल्या तरूणांनी १९१७ नंतरच्या काळांत तेंव्हाच्या पुण्यातल्या व महाराष्ट्रातल्या प्रस्थापित नेतृत्वाला जबरदस्त आव्हान दिले.(६६) या चळवळीने महाराष्ट्रातील बहुजन समाजामध्ये फार मोठी जागृती केली.

विदर्भामध्ये पंजाबराव देशमुख, पश्चिम महाराष्ट्रात कर्मवीर भाऊराव पाटील, शिक्षण महर्षि बापूजी साळुंखे, जगदाळे मामा यासारख्या कितीतरी व्यक्तींनी महाराष्ट्रामध्ये शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतलेले दिसून येते. सामान्य लोकांना शिक्षणाची दारे मोकळी केली त्याचा परिणाम म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात एका वेगळ्या चळवळीने जोर धारला. शिक्षण ही विशिष्ठ वर्गाची मक्तेदारी नसून शिक्षण हे सर्वासाठी आहे याची जाणीव लोकांना झाली. जो समाज शिक्षणाकडे डोळस दृष्टीने पहात नव्हता तोच समाज शिक्षण संस्था स्थापन करून शिक्षणाकडे आकर्षित झालेला दिसून येतो. मराठवाड्यातही पश्चिम महाराष्ट्रापेक्षा वेगळी स्थिती नव्हती. संख्येने जास्त असलेल्या हिंदु समाजाची अवस्था हैद्राबाद संस्थानात अत्यंत

बिकट होती. मुस्लीम राज्यकर्ते असल्याने मुस्लीमांना सर्वप्रकारचे संरक्षण असे. हैद्राबाद संस्थानात निजामाने उर्दु हे शिक्षणाचे माध्यम ठेवले होते. पाचवीपासून वरचे सर्व शिक्षण उर्दुतून होत असे. उच्च शिक्षण देखील देशी भाषेतून देणारे उस्मानीय हे एकमेव विद्यापिठ होते. संपूर्ण कायदा उर्दुतून होता. मुस्लीम विद्यार्थ्यांना शाळेत धर्म शिक्षण मिळण्याची सोय होती. अनाधिकृत धोरण म्हणून शिक्षणाचे प्रमाण कधी १० % च्यावर वाढता उपयोगी नाही. शिकणाऱ्या विद्यार्थ्यांत मुस्लीम विद्यार्थ्यांचे प्रमाण प्रचंड असले पाहिजे. निरुपद्रवी नोकऱ्यात २५ % हिंदु आणि ७५ % मुसलमान असे प्रमाण असावे. महत्वाच्या सर्व नोकऱ्यात मुसलमानांचे प्रमाणे शेकडा ९५ पर्यन्त टिकवून धरले जाई. असे सर्व जीवनच मुस्लीम वर्चस्वाखाली असे. ८५ % हिंदु अत्याचाराने पिडलेले व लाचार होते. (६७)

निजामाने खाजगी शाळेना परवानगी देण्याचा अधिकार स्वत:कडे ठेवला होता. त्यामुळे खाजगी शिक्षण संस्था काढण्यास निजामाचे बंधन होते. उर्दु खेरीज अन्य माध्यमांच्या शाळांना परवानगी द्यावयाची नाही, सरकारी अभ्यासक्रमाशिवाय इतर अभ्यासक्रम चालू द्यावयाचे नाहीत असे धोरण निजामाचे होते. त्यामुळे बहुजन समाजाची फारच कोंडी झालेली होती. १९१६ ते १९३५ पर्यन्त मराठवाडयात शाळांची संख्या ६ - ७ च्या घरात होती. १९३५ नंतर मात्र १५ ते २० खाजगी शाळा सरकारी कायद्याची तमा न बाळगता निघाल्या. या काढण्यामध्ये दिगंबरदास चौधरी, आबासाहेब पाटगावकर, राजारामपंत पोळ, स्वामी रामानंद तिर्थ, बाबासाहेब परांजपे, गोविंदभाई श्रॉफ, भाउसाहेब वैशंपायन इत्यादी लोकांचा पुढाकार होता. (६८) या मंडळीनी शिक्षण संस्था स्थापून त्याव्दारे बहुजन समाजाला शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला. १९३५ च्यानंतर ज्या शाळा निघाल्या त्यांना स्वामी रामानंद तिर्थ व बाबासाहेब परांजपे यांचीच

प्रेरणा होती. सरकारशी दोन हात करण्याचा प्रसंग आला त्या त्यावेळी या सर्व संस्था एकत्र येवूनच भांडल्या. यापैकी पुष्कळ शाळातून मराठी शिक्षणावर विशेष भर होता.(६९)

या शाळामुळे मराठवाडयातील राजकीय जागृती वाढत गेली. मराठवाडयामध्ये पोलीस कारवाई पर्यन्त जेवढे म्हणून राजकीय कार्यकर्ते, नेते व पूर्ण वेळ संघटक होते त्यापैकी किमान निम्मे तरी याच राष्ट्रीय शाळामध्ये शिक्षक होते. बहुजन समाजातील प्रमुखांना एकत्र आणण्याचे कार्य बीडच्या बलभीमराव कदम व एळंबकर यांनी केले. बीडला बोलाविलेल्या बैठकीत असे ठरविण्यांत आले, मराठवाडयात बहुजन समाजामध्ये शैक्षणिक कार्य सुरु करावे. नरसिंगराव देशमुख काटीकर हे मराठा समाजाचे पहिले पदवीधर होते. बलभीमराव, नारायणराव चव्हाण व आण्णासाहेब गव्हाणे हैद्राबाद येथे शिकत होते. त्यांचा या प्रयत्नात फार मोठा भाग होता. यातूनच सुमारे ४० लहानमोठया जातींचा समावेश असणाऱ्या मराठा तत्सम वर्गीय शिक्षण परिषदेचा जन्म झाला. या परिषदेचे प्रथम अध्यक्ष नरसिंगराव देशमुख व चिटणीस बलभीमराव कदम होते. त्यानंतरही पदे आण्णासाहेब गव्हाणे व उध्दवराव पाटील यांनी भूषविली. या परिषदेच्या प्रयत्नातूनच हैद्राबाद शहरामध्ये मराठा वसतीगृह काढण्यात आले. अनेक नामवंत लोक या वसतीगृहाचे विद्यार्थी होते. नारायणराव चव्हाण, आण्णासाहेब गव्हाणे, उध्दवराव पाटील ही मंडळी त्यापैकीच होत.(७०) मराठा व तत्सम जाती शिक्षण प्रसारक मंडळाने इतरांच्या प्रमाणे शिक्षणाच्या प्रसारास हातभार लावला. त्यांच्या प्रयत्नामुळे बहुजन समाजातील मुलांना आपले शिक्षण कार्य पूर्ण करता आले. शिक्षण संस्थांच्या माध्यमाने बहुजन समाजात राजकीय जागृती निर्माण केली. त्याचा परिणाम सर्वसामान्य माणसामध्ये राष्ट्रभक्ती वाढण्यामध्ये झाला.

बहुजन समाजावर निजाम राजवटीत अन्याय होत होता हे मागे निदर्शनास आले आहेच. बहुजन समाजातील नेते मंडळीनी केलेल्या कार्यामुळे बहुजन समाजातील तरूणवर्ग पेटून उठला. उध्दवरावांचेच उदाहरण घेतल्यास त्याची प्रचिती येईल. वास्तविक वकीली परिक्षा पास झाल्यानंतर वकीली करण्याचे सोडून बहुजन समाजातील व्यक्तींची चाललेली पिळवणूक पाहून त्यांचे तरूण मन बंड करून उठले. १९४६ मध्ये लातूर येथे महाराष्ट्र परिषादेचे शेवटचे अधिवेशन होणार होते. त्यात उस्मानाबादच्या फुलचंद गांधी या सावकारास परिषादेचे स्वागताध्यक्ष पद मिळणार होते. उध्दवरावानी व त्यांच्या तरूण मित्रानी हे अधिवेशन होवू देणार नाही " भक्षक हा रक्षक नसतो " हे पत्रक बैठकीत वाटले. बाबासाहेब परांजपेच्या मदतीने मार्ग काढण्यात आला व फुलचंद गांधीना येथुनपुढे सावकारी करणार नाही व शेतक-यांचे जमिनी परत करीन असे जाहीर करावे लागले.(७१)

उध्दवराव पाटलाचा हा पहिला प्रयत्न होता व तो यशस्वी झाला. महाराष्ट्र परिषाद ही बहुजन समाजामध्ये राजकीय जागृती करण्याचे कार्य करीत होती.(७२) महाराष्ट्र परिषादेच्या लातूर अधिवेशनानंतर हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसची निर्मिती झाली. परंतु निजामाने तिच्यावर बंदी घातली, पुढे १९४६ मध्ये तिच्यावरील बंदी उठविण्यात आली. स्टेट कॉंग्रेस ही बहुजन समाजाकडून चाललेली राजकीय चळवळ होती. या चळवळीने संस्थानातील प्रजेला निजामाच्या तावडीतून बंधामुक्त केले. अर्थात या चळवळीत सर्वच थरातील, पक्षातील मंडळी होती. स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठल्यानंतर कम्युनिस्टांना बाहेर जावे लागले.(७३)

स्टेट कॉंग्रेसमध्ये दोन मतप्रवाह बनत चालले होते. जहाल आणि पुरोगामी गटाचा सरकारवर विश्वास नव्हता. दुसरा मवाळाचा

गट होता. ( बी. रामाचारीचा ) १९४६ ते १९४८ ही दोन वर्षे हैद्राबाद संस्थान व तेथील जनता यांच्या जीवनात फार महत्वाची ठरली.(७४) कम्युनिस्टावरून स्टेट कॉंग्रेसमध्ये मतभेद निर्माण झाले. स्वामी व श्रॉफ यांचेवर कम्युनिस्ट धार्जिणे म्हणून हल्ले करण्यास आधीपासूनच सुरुवात झाली होती.(७५)

हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसमध्ये दोन गट पडले होते. हे मागे निदर्शनास आले आहे. स्टेट कॉंग्रेसमध्ये अंतर्गत असणारा शेतकरी संघ पुढे त्यातून फुटून निघाला व त्यांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. त्यात आण्णासाहेब गव्हाणेबरोबर नरसिंगराव देशमुख, उध्दवराव पाटील होते.(७६) उस्मानाबाद जिल्हयात उध्दवरावांच्या नेतृत्वाखाली सावकारी विरोधी चळवळ, निजामाच्या अन्यायाविरूध्द चळवळ व शैक्षणिक चळवळ, यासारख्या बहुजन समाजाच्या विकासाच्या चळवळी त्या काळात मराठा व तत्सम जाती शिक्षण प्रसारक मंडळाने चालविल्या होत्या.(७७)

भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु हैद्राबाद संस्थान मात्र संघराज्यात सामील झाले नाही. स्टेट कॉंग्रेसने हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात सामील होईल असा ठराव मंजूर केला. निजामाच्या आडमुठेपणामुळे हैद्राबाद मुक्ती संग्राम सुरू झाला. शेवटी निजाम शरण आला. हैद्राबाद संस्थान संघराज्यात सामील झाले. हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या अगोदर स्टेट कॉंग्रेस, आर्यसमाज या बहुजन समाजाकडून चालविल्या जाणा-या चळवळी होत्या. आर्यसमाजाने आपली मर्यादा धार्मिक क्षेत्रापुरतीच निश्चित करून घेतली व राजकीय क्षेत्रात तिने हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस ही संघटनाच आपली प्रतिनिधी मानली. (७८)

शिवाय आर्यसमाजातील मातब्बर मंडळी स्टेट कॉंग्रेसमध्ये आल्याने स्टेट कॉंग्रेस हीच खा-या अर्थाने बहुजन समाजाची चळवळ बनली. तिने संस्थानातील प्रजेवर होणा-या अन्यायास वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

———— . ————

# प्रकरण २ रे

## संदर्भ सूची


१) प्रा. भांडवलकर एस. एस. – "राजधर्म " दैनिक लातूर १२-७-८७ च्या लेखाआधारे.

२) प्रा. कल्याणकर बा. ह. – संघर्ष – प्रकाशक खा. बाळासाहेब पवार पृष्ठ– २३

३) माजगांवकर श्री. ग. – साप्ताहिक माणूस ४ फेब्रुवारी १९७८ पृष्ठ – ४

४) प्रा. कल्याणकर बा. ह. – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ३०

५) उक्त पृष्ठ – ३०

६) माजगांवकर श्री. ग. – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ४

७) उक्त पृष्ठ ५

८) उक्त पृष्ठ ५

९) प्रा. भांडवलकर एस. एस. – उपरिनिर्दिष्ट १६-७-८७ चा लेख

१०) प्रा. कल्याणकर बा. ह. – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ३०

११) उक्त पृष्ठ ३०

१२) प्रा. भांडवलकर एस, एस. – उपरिनिर्दिष्ट १२-७-८७ चा लेख

१३) श्री देशमुख एम. डी. – उस्मानाबाद यांच्या मुलाखतीआधारे

१४) भालेराव अनंत – हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा भारत मुद्रक आणि प्रकाशक लिमिटेड औरंगाबाद सप्टेंबर १९८७ पृष्ठ २६२

१५) उक्त पृष्ठ ३१२ ते ३२०

१६) उक्त पृष्ठ ३२१

१७) उक्त पृष्ठ ३२९-३३०

१८) प्रा• कल्याणकर बा• ह• - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ २५

१९) भालेराव अनंत - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ५७८

२०) प्रा• कल्याणकर बा• ह• - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ९

२१) उक्त पृष्ठ १५

२२) उक्त पृष्ठ १

२३) तापडीया सुरेश - झुंजार सेनानी - मुद्रक बजाज उद्योग लातूर १२ जुलै १९८७ पृष्ठ ३०

२४) प्रा• भांडवलकर एस• एस• - उपरिनिर्दिष्ट १२-७-८७ चा लेख

२५) उध्दवराव पाटील यांच्या ध्वनीमुद्रीत भाषणाच्या आधारे

२६) प्रा• भांडवलकर एस• एस• - उपरिनिर्दिष्ट १२-७-८७ चा लेख

२७) तापडीया सुरेश - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ १३

२८) प्रा• ठोके मो• नी• " श्रमीकांचा कैवारी " पारस प्रकाशन बेळगांव पृष्ठ २७

२९)

३०) श्री माजगांवकर श्री• ग• - साप्ताहिक माणूस ४ फेब्रुवारी १९७८ पृष्ठ ५

३१) तापडीया सुरेश - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ४

३२) प्रा• कल्याणकर बा• ह• - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ २४

३३) उक्त पृष्ठ ३१

३४) देशमुख एम. डी. – उस्मानाबाद यांच्या मुलाखतीआधारे.

३५) प्रा. कल्याणकर बा. ह. – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ १३

३६) खापले माणीकराव माजी आमदार तुळजापूर यांच्या मुलाखती आधारे.

३७) प्रा. कल्याणकर बा. ह. " युगकर्ता " एप्रिल-मे-जून १९८७ त्रैमासिक पृष्ठ ११-१२

३८) प्रा. भांडवलकर एस. एस. – उपरिनिर्दिष्ट १२-७-८७ चा लेख.

३९) प्रा. कल्याणकर बा. ह. – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ९

४०) प्रा. भांडवलकर एस. एस. उपरिनिर्दिष्ट १२-७-८७ चा लेख.

४१) प्रा. कल्याणकर बा. ह. युगकर्ता त्रैमासिक एप्रिल-मे-जून १९८७ पृष्ठ ७

४२) फडके य. दी. – केशवराव जेधे – प्रकाशक दामोदर दिनकर कुलकर्णी विद्याप्रकाशन पुणे नोव्हेंबर १९८२ पृष्ठे ४ ते १६

४३) प्रा. कल्याणकर बा. ह. – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ७

४४) उक्त पृष्ठ २७

४५) साळुंखे एम. बी. – दे. भ. तुळशीदास जाधव गौरवग्रंथ पृष्ठ ८१- ८२

४६) भाई लाड जी. डी. – पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य भारती विद्यापिठ प्रकाशन पुणे पृष्ठ २०४

४७) प्रा. कल्याणकर बा. ह. – उध्दवराव यांची घेतलेली ध्वनीमुद्रीत मुलाखती आधारे १९८३

४८) प्रा. कल्याणकर बा. ह. = उपरिनिर्दिष्ट पृष्ठ २१

४९) फडणीस जगन - शेतकरी कामगार पक्षाचे राजकारण
अजब मुद्रणालय, कोल्हापूर पृष्ठ ३७

५०) प्रा. कल्याणकर बा. ह. - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ २१

५१) तापडीया सुरेश - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ३०

५२) उक्त पृष्ठ ६९-७०

५३) श्री खापले माणीकराव - माजी आमदार तुळजापूर यांच्या मुलाखती आधारे

५४) पाटील उध्दवराव यांच्या ध्वनीमुद्रीत भाषणा आधारे.

५५) तापडीया सुरेश - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ११

५६) प्रा. कल्याणकर बा. ह. - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ २५

५७) फडके य. दी. - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ९०

५८) प्रा. कुरूंदकर नरहर - हैद्राबाद विमोचन आणि विसर्जन
संपादक प्रा. द. य. जोशी १९८५ पृष्ठ ९५

५९) फडके य. दी. उपरिनिर्दिष्ट पृष्ठ १६२

६०) उक्त पृष्ठ १८२

६१) उक्त पृष्ठ १७८

६२) उक्त पृष्ठ १८२

६३) उक्त पृष्ठ २००

६४) उक्त पृष्ठ २०२

६५) प्रा. कल्याणकर बा. ह. उपरिनिर्दिष्ट पृष्ठ २६

६६) फडके य. दी. - उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ५

६७) प्रा. कुरूंदकर नरहर – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ११४

६८) भालेराव अनंत – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ५७–५८

६९) उक्त पृष्ठ ५८

७०) उक्त पृष्ठ ५९–६०

७१) प्रा. कल्याणकर बा. ह. – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ २४

७२) भालेराव अनंत – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ८०–८१

७३) उक्त पृष्ठ २२९

७४) उक्त पृष्ठ २३८

७५) उक्त पृष्ठ २४३

७६) प्रा. कल्याणकर बा. ह. – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ २५

७७) प्रा. कल्याणकर बा. ह. – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ २७

७८) भालेराव अनंत – उपरिनिर्दिष्ट पृष्ठ ६०